Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

Scan QR code to visit... Epaper Portal

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक ९१ • Title - Code :- MAHMAR49513 • मंगळवार दि.२६ डिसेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# नावापुढे आधी आईचे मग वडिलांचे नाव लागेल

# महिला धोरणाला मंत्रिमंडळाच्या मंजुरीची प्रतीक्षा

**मुंबई–महिलांना सर्व दृष्टीने सक्षम करण्यासाठी मांडण्यात आलेले राज्याचे चौथे महिला धोरण राज्य मंत्रिमंडळाच्या मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे. महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी १० डिसेंबर रोजी नागपूरमध्ये हिवाळी अधिवेशन काळात झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हे धोरण मंजुरीसाठी मांडले. या बैठकीत काही वरिष्ठ मंत्र्यांनी धोरणात काही नव्या तरतुदी सुचवल्याने या धोरणाला मंजुरी मिळालेली नाही. त्यामुळे आता हे धोरण नव्या वर्षातच मंजूर होऊन त्याची अंमलबजावणी सुरू होण्याची शक्यता आहे.चौथ्या महिला धोरणात महिलांच्या सक्षमीकरणाच्या दृष्टीने रोजगार, आरोग्य, मानसिक आरोग्य, महिला उद्योजकांना सवलती, सामाजिक सन्मान, लिंगभेदविरोधात तरतूद पर्यावरण संरक्षणात महिलांचा सहभाग अशा विविध पैलूंवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.**



महिलांना जास्त जागा देणाऱ्यांना सरकारकडून सवलती मुलाच्या जन्मानंतर आता वडिलांच्या नावाबरोबर आईचेही नाव लावण्याची तरतूद करण्यात आली आहे. सध्या जन्मानंतर वडिलांचे नाव लावले जात आहे. महिला धोरणाच्या मंजुरीनंतर मुलाच्या नावानंतर आधी आईचे आणि नंतर वडिलांचे नाव आणि नंतर आडनाव लावले जाणार आहे. सहकारी संस्थांमध्ये, साखर कारखान्यांमध्ये महिलांना जास्त जागा देणाऱ्यांना सरकारकडून सवलती दिल्या जाण्याची तरतूदही धोरणात आहे. प्रसूतीनंतर महिलांच्या मानसिक आरोग्याकडेही महिला धोरणात लक्ष देण्याची तरतूद करण्यात आली आहे. हे महिला धोरण कागदावर न राहता त्याची अंमलबजावणी व्हावी यासाठी संबंधित विभागाचे मंत्री आणि पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली जाणार आहे. ही समिती धोरणाच्या अंमलबजावणीचा नियमित आढावा घेणार आहे.हे धोरण केवळ कागदावर राहणार नाही. विविध विभागांनी धोरणातील तरतुदींची अंमलबजावणी केली की नाही याचा नियमित आढावा घेतला जाणार आहे. तसेच या धोरणात लवचिकताही आहे. एखाद्या तरतुदीत काही त्रुटी असतील तर त्यात सुधारणा करण्यास या धोरणात वाव ठेवण्यात आला आहे. पूर्वीच्या तीन धोरणात यांचा समावेश नव्हता. – अदिती तटकरे, महिला व बालविकास मंत्री.

## लोकबिरादरी प्रकल्प म्हणजे आदिवासींचे आशास्थान : माजी.आ.दिपक आत्राम

**भामरागड । प्रतिनिधी**

ज्येष्ठ समाजसेवक बाबा आमटे यांनी ओसाड आणि खडकाळ जमिनीवर 'आनंदवन' उभारला. कुष्ठ रुग्णांना आत्मसन्मान मिळवून दिला. ताठ मानेने जगण्याचा बळ दिल आहे.भामरागड सारख्या अतिसंवेदशील भागात त्याकाळी भूक, रोगराई, अंधश्रद्धा यांच्या विळख्यात सापडलेल्या आदिवासींचे जीवनमान उंचावण्यासाठी डॉ प्रकाश आमटे यांच्यावर धुरा सोपविली. विकास आणि प्रकाश या त्यांच्या कर्तुत्ववान मुलांनी बाबा आमटे ह्यांचा हाच वारसा पुढे चालवला आहे. डॉ. प्रकाश आणि डॉ. मंदाकिनी आमटे हे गेली ५० वर्षापासून भामरागडच्या जंगलात राहून आदिवासींचे जगणं सुसहाय्य व्हावं म्हणून प्रयत्नरत आहेत.आज हेमलकसा येथे असलेला 'लोकबिरादरी' प्रकल्प म्हणजे आदिवासींचे आशास्थान असल्याचे प्रतिपादन माजी आ. दिपक आत्राम यांनी केले.

२३ डिसेंबर रोजी लोक बिरादरी प्रकल्पाला ५० वर्षे पूर्ण झाली त्यानिमित्ताने सुवर्ण महोत्सव साजरा केला जात आहे.यावेळी माजी आ.दीपक आत्राम यांनी उपस्थित राहून डॉ प्रकाश व डॉ मंदाकिनी आमटे यांच्या सामाजिक कार्याची प्रशंसा करत शाल श्रीफळ



देऊन त्यांना गौरविले. निरोगी आरोग्य आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या .यावेळी आलापल्ली चे माजी सरपंच विजय कुसनाके तसेच भारत राष्ट्र समितीचे कार्यकर्ते उपस्थित होते.पुढे बोलताना डॉ.प्रकाश आमटे व डॉ. मंदाकिनी आमटे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी भामरागडच्या दुर्गम जंगलात १९७२ साली आदिवासींच्या आरोग्यासाठी काम करायला सुरुवात केली. हळूहळू हे काम विस्तारत गेलं. २३ डिसेंबर १९७३ साली हेमलकसा लोकबिरादरी प्रकल्प सुरू झाला. आरोग्यासोबतच शिक्षण, आदिवासींची उपजीविका आणि वन्यजीव संरक्षण यामध्ये गेली पन्नास वर्षापासून काम सुरू आहे. माडिया, गोंड आदिवासी भूक, रोगराई, अंधश्रद्धा यांच्या विळख्यात सापडले होते. त्यांना जंगलापलीकडचा जग माहित नव्हतं. आज मात्र तिथे सुसज्ज रुग्णालय, शाळा आहे. या ठिकाणची मुलं शिकून डॉक्टर, वकील, अभियंते, फॉरेस्ट गार्ड, ग्रामसेवक, तलाठी झाले आहेत. आजही या ठिकाणी उत्तम आरोग्याची सुविधा आणि शिक्षण दिल जात आहे. 'अंधाराकडून उजेडाकडे' झालेल्या प्रवासाचे संपूर्ण श्रेय लोकबिरादरी प्रकल्पाच्या विलक्षण प्रयत्नांना जाते .असे सांगत त्यांनी आरोग्य,शिक्षण आणि सिंचनासाठी काम करणाऱ्या आमटे परिवाराच्या तिसऱ्या पिढीला सुद्धा त्यांनी भरभरून शुभेच्छा दिल्या.

## शिक्षणा शिवाय सर्वांगीण विकास होत नाही - डॉ.सतिश वारजूकर

**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर विधानसभा क्षेत्रातील चिमूर तालुक्यातील माना आदिम जमात मंडळ मालेवाडा यांच्या सयुक्त विद्यमाने नागदिवाळी महोत्सव स्नेहमीलन सोहळा तथा नूतनवर्षाभिनंदन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.त्या प्रसंगी मार्गदर्शन करतांना ७४ चिमूर विधानसभा क्षेत्राचे समन्व्यक तथा उपाध्यक्ष ओबीसी महासंघ महाराष्ट्र प्रदेश डॉ. सतिश वारजूकर,चिमूर तालुका कांग्रेस कमिटी अध्यक्ष डॉ. विजय गावंडे, जेष्ठ नेते केशव वरखडे,पत्रु दडमल,बंडू बारेकर, दिगांबर दडमल,बंडूभाऊ घोडमारे, जांबूळे ,व समस्त समाज बांधव उपस्थित होते.



कार्यक्रमा दरम्यान समाज बांधवानी कार्यक्रम घेण्यासाठी व्यासपीठाची मागणी केली असता कसलाही विलंब न करता व्यासपिठाच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले समाज बांधवानी डॉ. सतिश वारजुकर यांचे आभार मानले. डॉ. सतिश वारजूकर यांनी मार्गदर्शन करतांना म्हणाले शिक्षणा शिवाय सर्वांगीण विकास होत नाही, त्यासाठी शिक्षण घेणे गरजेचे आहे. प्रत्येकाला समान बुद्धी असते म्हणून प्रत्येकाने त्या बुद्धीचा वापर करून स्वतःची प्रगती साधावी. शिक्षण व पुस्तक वाचन यामुळे बुद्धी प्रगल्भ होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले होते की मानवाचे जीवनाचे अंतिम ध्येय हे त्यांच्या बुद्धीचा विकास कसा होईल यावर असले पाहिजे. कारण जगात जे लोक हाताने काम करतात फक्त आपले पोट भरतात आणि जे लोक बुद्धी ने मेहनत करतात ते चैनीचे जीवन जगत असतात म्हणून थोर महापुरुषांचे विचार अंगी कारणे काळाची गरज आहे.

## पहिल्याच दिवशी ३३६ खेळाडूंना मोफत ताडोबा सफारी

### राष्ट्रीय स्पर्धेसाठी आलेल्या खेळाडूंनी मानले वनमंत्र्यांचे आभार



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राज्याचे वनमंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या पुढाकाराने बल्लारपूर तालुका क्रीडा संकूल येथे राष्ट्रीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून देशभरातील सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशातून जवळपास ३ हजार खेळाडू जिल्ह्यात दाखल होत आहे. वाघांच्या भुमीत येणा–या विविध राज्यातील खेळाडूंना जगप्रसिध्द ताडोबा व्याघ्र प्रकल्पाची मोफत टायगर सफारी करण्याच्या सुचना पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी प्रशासनाला दिल्या होत्या.

त्यानुसार पहिल्याच दिवशी विविध राज्यातील ३३६ खेळाडूंनी मोफत टायगर सफारीचा मनसोक्त आनंद लुटला.राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेच्या निमित्ताने पर्यटन समिती स्थापन करण्यात आली असून वनविभागाच्या वतीने खेळाडूंना मोफत टायगर सफारीचे नियोजन करण्यात आले आहे. यात सोमवारी सकाळच्या सत्रात १६९ खेळाडू, त्यांचे प्रशिक्षक, व्यवस्थापक तर दुपारच्या सत्रात १६७ खेळाडू अशा एकूण ३३६ जणांना मोफत सफारी घडविण्यात आली.सकाळच्या सत्रात केंद्रीय विद्यालय संघटनचे ५५ खेळाडू, महाराष्ट्राचे ६३ आणि पश्चिम बंगालचे ५१ तर दुपारच्या सत्रात हिमाचल प्रदेशचे ४६ खेळाडू, पंजाब ६५, जम्मू काश्मिर ४१ आणि ओडीसाचे १५ अशा एकूण ३३६ खेळाडूंनी मोफत ताडोबा सफारीचा आनंद लुटला. यावेळी सर्व खेळाडूंना वनविभागाच्या वतीने वेलकम किट देण्यात आली. यात टी–शर्ट, कॅप, किचन, ताडोबा डायरी मॅगझीन व ताडोबाची माहिती पुस्तिकेचा समावेश होता. तसेच सर्वांना सकाळी उत्तम नाश्ता व दुपारी जेवण देण्यात आल्याचे वनविभागाने कळविले आहे

## रानटी हत्तींचा हैदोस;पाच घरांची पडझड

### जीवनावश्यक साहित्यांसह शेतपिकांचीही नासधूस





**आरमोरी । प्रतिनिधी**

गोदिंया जिल्ह्यातून परत गडचिरोली जिल्ह्यात प्रवेश करणा–या रानटी हत्तींच्या कळपाने पुन्हा उच्छाद मांडला आहे. मागील काही दिवसांपासून आरमोरी वनपरिक्षेत्रा अंतर्गत हत्तींचा संचार कायम असून रविवारच्या रात्री रानटी हत्तींच्या कळपाने पाथरगोटात हैदोस घालित गावातील पाच घरे नेस्तनाबूत केली. यादरम्यान कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी हत्तींनी घरातील साहित्यांसह धान, तांदळासह शेतातील पिकांचीही नासधूस केल्याने पाथरगोटासह परिसरातील नागरिकांमध्ये हत्तींची दहशत कायम आहे. मागील तीन वर्षापासून जिल्ह्यात उच्छाद मांडणा–या २० ते २४ संख्येत असलेल्या रानटी हत्तींनी गोंदिया जिल्ह्यात प्रवेश केल्याने जिल्हावासीयांनी सुटकेचा निश्वास सोडला होता.

> **“ घटनेची माहिती प्राप्त होताच वनविभागाच्या पथकाद्वारे नुकसानीचा पंचनामा करण्यात आला. हत्तींद्वारे ३ ते ४ घरांची पडझड करण्यात आली आहे. तसेच जीवनावश्यक साहित्यांसह नासधूस झाली आहे. गावालगतच्या काही शेतपिकांचेही नुकसान झाले आहेत. सद्यस्थितीत हत्ती पाथरगोटा– पळसगाव– डोंगरगाव परिसरात संचारत असून कळपावर नजर ठेवण्यासाठी वनविभागाचे पथक गस्तीवर आहेत. तसेच हुल्ला पार्टीचे पथकही यासाठी सज्ज असून हत्तींच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यात येत आहे.**
>
> अविनाश मेश्राम, वनपरिक्षेत्र अधिकारी आरमोरी

मात्र आठवड्याभरातच हत्तींनी परत कुरखेडा तालुका हद्दीतून जिल्ह्यात प्रवेश केला. प्रारंभी देसाईगंज तालुक्यातील शंकरपूरसह परिसरात उच्छाद मांडणा–या हत्तींनी आरमोरी तालुक्यातील पाथरगोटा गावाकडे वळविला.जंगल परिसराला लागून असलेल्या पाथरगोटा येथे हत्तींनी रविवारी मध्यरात्री १ वाजताच्या सुमारास प्रवेश करीत उच्छाद मांडल्याने हत्तींच्या या आक्रमक स्वभावाचे पाथरगोटा वासीयांना पुन्हा दर्शन घडले. रानटी हत्तींनी गावातील अशोक राऊत, सुरज दिघोरे, मंगल प्रधान, चंद्रशेखर बगमारे, दुर्गादास बगमारे यांच्या घरावर हल्ला चढवित घरांची मोठ्या प्रमाणात नासधूस केली. वेळीच कुटूंबिय घराबाहेर पडल्याने जीवितहानी टळली.दरम्यान हत्तींनी घरातील धान, तांदूळ,अन्नधान्यासह जीवनावश्यक साहित्यांची प्रचंड नासाडी केली. यात संबंधितांचे प्रचंड नुकसान झाले असून अन्न, वस्त्र, निवा–यापासून ते बेघर झाले आहेत.घटनेची माहिती प्राप्त होताच आरमोरी वनपरिक्षेत्र अधिकारी अविनाश मेश्राम यांना मिळताच आज, सोमवारी सकाळीच वनविभागाचे पथक गावात रवाना करण्यात आले. आरएफओ मेश्राम यांच्या नेतृत्वात क्षेत्र सहाय्यक किनेकर, वनरक्षक अतकरे, एफडीसीएम क्षेत्र सहाय्यक शिऊरकर, वनरक्षक अनिता लट्टाये, पंढरी, तेलंग, गजानन ठगे, सुधाकर राठोड आदींसह वनविभागाचे कर्मचारी तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

# पद्मश्री डॉ.प्रकाश बाबा आमटे सादर प्रणाम!

**आज आपण ७५ व्या अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहात.**
**आपले अभिष्टचिंतन!!**
**गेली साडेतीन दशके संपूर्ण बाबा आमटे कुटुंबाशी, आनंदवन, लोक बिरादरी प्रकल्प, हेमलकसा, सोमनाथ प्रकल्प मूळ व इतर संस्थांशी मी प्रेम, आदर, आपुलकीने जोडलो गेलो आहे. १९८५ च्या बाबांच्या भारत जोडो अभियानात कन्याकुमारी ते काश्मिर सामील झालो होतो. तेंव्हा कन्याकुमारीत बाबांना प्रथमच पाहिले होते. त्यांचा कणखर आवाज, इंग्रजी भाषेवर केवढ प्रभुत्व होतं. आणि देश कठीण व भयानक समस्यातुन जातोय त्याला सामोरी गेलं पाहिजे म्हणून व पंजाब मध्ये जो दहशतवाद चालू होता व इतर राज्यात आपसात मतभेद व भांडणे चालू होती. त्यामुळे देश अस्वस्थ व विघटनाच्या मार्गावर होता. म्हणून त्यांनी भारत जोडो अभियान चालवण्याचा आणि मने जोडण्याच्या, साधण्याचा प्रयत्न केला या यज्ञात मी सामील होऊन माझ्या कर्तव्यासाठी माझा वेळ दिला होता. त्यापूर्वी आनंदवन व हेमलकसा येथे आलो नव्हतो व प्रकल्प पहिला नव्हता. महारोगी सेवा समीतीचा पहिला प्रकल्प मूळ येथील सोमनाथ प्रकल्प मी १९८६ साली श्रम संस्कार शिबिराला गेलो तेंव्हा पहिला. नंतर आनंदवन ला गेलो. मला हेमलकसा येथील लोक बिरादरी प्रकल्प पाहण्याची इच्छा होती पण योग्य संधी येत नव्हती. नंतर अशी सुवर्ण संधी आली १९८९ साली. बाबांचा ७५ वा, तुमचा ५० वा वाढदिवस त्यानिमित्त हेमलकसा येथे येण्याची उत्तम संधी आली.**



भामरागड हे गडचिरोली जिल्ह्यातील तालुक्याचे ठिकाण. आयुष्यात चंद्रपूरच्या पुढे कधी गेलेलो नव्हतो. ओढ होती तुम्हाला भेटण्याची, लोक बिरादरी प्रकल्प पाहण्याची. २४ डिसेंबर १९८९ मी आनंदवनला गेलो तिथून तुमच्या कडे कसे जायचे हे विचारून २५ तारखेला मी आनंदवनहून अहेरीला आलो. तिथून भामरागडला जास्त बसेस नाहीत. तिथुन अल्लापल्लीला जाण्याच्या सूचना बस नियंत्रकानी दिल्या. आल्लापल्ली अहेरी पासून अगदीच जवळ आहे. नागपूर व चंद्रपूर सह इतर ठिकाणच्या रस्त्याने आल्लापल्ली जोडले गेले होते. गडचिरोली, चंद्रपूर हे नक्षलवादी जिल्हे आहेत हे माहीत होतं. अशा ठिकाणी मी एकटाच निघालेलो. मनात काहूर, भीती व गैरसमज होते. चंद्रपूर पासून आल्लापल्ली पर्यंत सागवानी झाडांचे प्रचंड जंगल. आणि आल्लापल्ली ते भामरागड हे ६० किमी अंतर तर अति घनदाट जंगल होते. अशा जंगलात तुमचे आरोग्य व शिक्षण विषयक काम चालू होते. माझ्या मनात खूप संमिश्र भावना होत्या. एक तर तुम्हाला व डॉ. मंदाताईना भेटण्याची व प्रकल्प पाहण्याची दुर्दम्य इच्छा बळावलेली आणि ती इच्छा पूर्ण होणार हा आनंदही मनात होता. २ तास झाले कसलेही वाहन भामरागडला जायला आले नव्हते. उभा राहून खाजगी गाड्यांना हात दाखवून होतो. शेवटी नागपूरच्या दिशेने ऐक गाडी आली. मी हात दाखवला थांबली नाही. पुढे जाऊन थांबली. मी पळत गेलो आणि मला भामरागडला यायचं आहे कृपया मला घेऊन चला. दोन तास झाले बसची वाट बघतोय बसच नाही. असं म्हटल्यावर भारत जोडो अभियानात मला पाहिलेले एक गृहस्थ गाडीतून उतरले आणि मला आश्चर्याचा धक्काच बसला. हा दगडू लोमटे आहे असे उदगार त्यांनी काढले. मला हायसे वाटले. मी त्यांना ओळखत नव्हतो. मला कशीबशी जागा मागच्या सीटवर केली. गाडीत बरेच जण होते पण माझ्या ओळखीचे कोणी नव्हते. पोहचल्यावर परिचय झाला आशुतोष शेवाळकर, त्यांच्या पत्नी, अविनाश पटवर्धन व इतर होते. ६० किमीच्या प्रवासात संपूर्ण जंगल, आदिवासी पाडे, कुठे घनदाट जंगलात पाड्याकडे जाणाऱ्या पाऊल वाटा. भामरागडच्या जंगलातल्या प्राण्यांनी आदिवासींवर केलेले प्राणघातक भीषण हल्ले, पोलीस व नक्षलवादी यांच्यातला रक्तरंजित संघर्षाच्या वृत्तपत्रात आलेल्या बातम्या नजरेतून जात नव्हत्या.

लोकबिरादरी प्रकल्पात मी प्रथमच आलो होतो. दुसऱ्या दिवशी बाबा व तुमचा वाढदिवस त्यानिमित्त कार्यक्रम होणार होता. रात्री प्रचंड थंडी होती. प्रकल्पात तेंव्हा सगळ्यांना राहता येईल एवढी निवास व्यवस्था नव्हती म्हणून कांही तंबू त्यात कॉट, गादी, पांघरायला चादर अस नीटनेटकी व्यवस्था होती. मला थंडीचा अंदाज नव्हता. लाकडे, ओंडके पेटवून शेकोट्या पेटवलेल्या होत्या. शेकोटीजवळ बसलो की बरं वाटायचं. बाजूला झालो की तोबा थंडी. रात्री अनेक ओळखीचे, तुमच्या प्रकल्पातील कार्यकर्ते, आणि मित्र परिवार यांच्या आपापसात मध्यरात्री पर्यंत गप्पा. आम्हाला शाळेच्या खोलीत जागा दिली होती. सोबत भारत जोडो साथी प्रकाश ढोबळे होता. झोपण्यास गेलो पण थंडी एवढी होती की शेवटी सतरंजी ओढून झोपलो. मला खूप आश्चर्य वाटलं. एवढी थंडी पण तुम्ही, बाबा, कांही कार्यकर्ते पांढरी शुभ्र अर्धी चड्डी व बनियनवर होता. तुम्हाला या मारक थंडीचा भयंकर त्रास कसा होत नसेल? की आदिवासी जसं जगतात ते अनुभव जीवन तुम्ही जगण्याची हिम्मत ठेवता? म्हणूनच हेमलकसा, भामरागडला बाबा, तुम्ही, मंदाताई, कार्यकर्ते प्रकल्प टाकू शकला किंवा टाकला असेल का? ही धारणा माझ्या मनात आली. तुम्ही एमबीबीएस झाल्यावर बाबा तुम्हाला भामरागड व आदिवासी यांचे जीवन पाहायला घेऊन आले. तुम्हाला बाबांनी या अतिदुर्गम, अनेक गैरसोयी असलेला या भागात आरोग्य प्रकल्प राबवायचे आदेश दिले. भामरागडचा परिसर निवडला. इंद्रावती, पर्लकोटा व पामलगौतमी या तीन नद्यांच्या त्रिवेणी संगमाच्या विहंगम दृश्य तुम्हाला व बाबांना नक्कीच आवडले असणार. त्याच नदीचा काठावर असलेले हेमलकसा हा आदिवासी पाडा. त्या पाड्याच्या आसपास तुम्ही आपला प्रकल्प राबवला. तुमच्या, मंदाताई व महारोगी सेवा समितीच्या कार्याने व प्रचंड मेहनतीने आज जगाच्या नकाशावर हेमलकसा व भामरागड ओळखले जाते. हा तुमचा हेमलकसा येथे राहून आरोग्य सेवा देण्याचा अभिमाननस्पद निर्णय होता व आहे.

२६ डिसेंबरला सकाळी बाबांच्या वाढदिवसाचा कार्यक्रम होता. गांधींजीच्या सहकारी डॉ.सुशीला अय्यर, सुरेश द्वादशीवार, चंद्रपूरचे खासदार नरेश पुगलिया, यदुनाथ थत्ते, असे महान व्यक्ती यासाठी पाहुणे म्हणून आलेले होते. कार्यक्रमाची लगबग सुरू झाली. बाबा व साधनाताई यांना आश्रम शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थिनी लेझमी खेळत व वाजगाजत व्यासपीठाकडे घेऊन येत होते. शाळेच्या भव्य मंचावर बाबा व ताई आल्या त्याच बरोबर पाहुणे मंचावर आले. तीन तास कार्यक्रम झाला. तुम्हाला जस प्रथम पाहात होतो तसं तुमचं छोट भाषण पण प्रथमच ऐकले. बाबांसारखाच खडा हुबेहूब आवाज. प्रामाणिक काम करणारे किती कमी बोलतात हे मला तुमच्या भाषणाने पटले. तुमच्या भाषणा नंतर डॉ. पिल्लू बोलला. लिहून आणलेले भाषण खूप प्रेरक होते. तुमच्या प्रमाणेच त्यानेही आदिवासी (माडिया व गोंड आदिवासी मोठ्याप्रमाणावर आहेत) समाजाच्या आरोग्य, शिक्षण, भौतिक सुविधा उपलब्ध करण्यासाठी, प्रगतीसाठी व आदिवासींचे जीवनमान उंचावण्यासाठी माझे शेवटच्या क्षणा पर्यंतचे आयुष्य अर्पण करीत आहे असे ते भाषण होते हे आजही आठवते. तरुणांनी प्रेरणा घ्यावी असे भाषण पिल्लुचे झाले होते.

दुपारी शाळेच्या विद्यार्थ्यांचा कार्यक्रम, रात्री माडिया व गोंड आदिवासीचे प्रसिद्ध नृत्य. कांही अर्धनग्न फक्त टॉवेल घटलेलता स्त्रिया व लंगोट घातलेले आदिवासी या भागात मी प्रथमच पहात होतो. आदिवासी लोकांची जगण्यात प्रमाणिक व नैतिकता असते. चोरी, बलात्कार, भृणहत्या ते करीत नाही ही केवढी मोठी जीवनशैली इतर प्रगत समाजाने आदर्श घ्यावी अशीच आहे. हे तुम्ही अनेकवेळा भाषणात व मुलाखतीत सांगितले आहेच. २७ तारखेला वृक्षदिंडी निघाली. आलेल्या पाहुण्यांच्या हस्ते झाडे लावली गेली.माझ्याही हस्ते एक झाडे लावले याचा मला आजही आनंद होतो. नंतर अनेक वेळा कार्यक्रमाचा निमित्त आलो. प्रत्येक वेळी मी सर्वांसोबत झाड लावले आहे. हा झाडे लावण्याचा शिरस्ताच तुम्ही सुरू केला होता व आहे.

नंतर अनेक वेळा तुमच्याकडे येत गेलो. कधी मित्रांना, कधी सहली काढल्या, कधी कौटुंबासह आलो. तुमच्याकडे येण्यासाठी लोक आतुर असतात ते तुमचे प्राणी प्रेम व प्राण्यांना हाताळण्याची प्रेमळ हातोटी. सिंह, वाघ, बिबटे, वेगवेगळे प्राणी, पक्षी यांना तुमच्या मुलायम हाताचा स्पर्श झाला की किती आनंद होतो हे लाखो लोकांनी पाहिले आहे. हा अद्भूत चमत्कारच आहे. पुढे नातवाना पण हा लळा लागला आहे. कधी कधी या प्राण्याना हाताळताना तुमच्या जीवावरही बेतले आहे पण तुम्ही लोकांना कळू दिले नाही. कारण प्राण्याबद्दल चुकीची धारणा होऊ नये या उदात्त हेतूने. आपले प्राणी हाताळताना व्हिडीओ, फोटो अनेकवेळा पाहिले आहे. आदिवासींचे जगणे, संस्कृती त्यांच्या चालीरीती, त्यांचे अन्न संस्कृती हे तुम्ही जवळून पाहिले आणि तुमच्यामूळे जगाला ज्ञात झाले. त्यातच डॉ. प्रकाश बाबा आमटे या समृद्धी पोरे यांनी काढलेला चित्रपट यामुळे तुम्ही जगभर प्रसिद्धीस आलात.

आदिवासी यांचे जीवनमान शिक्षण झाले तरच प्रगती होवू शकते हे लक्षात आल्यावर आपण प्रकल्पाच्या वतीने लोक बिरादरी प्रकल्पात आश्रम शाळा, नेलगुंडा, चिचपल्ली व अन्य ठिकाणी सुंदर व निसर्गाला लाजवेल अशा सुबक, रेखीव, देखण्या इमारती उभा केल्यात. निसर्ग व जंगल याला साजेशी सजावट केली आहे. जंगलातली शाळा शहरी शाळेपेक्षा हटके आहेत. मुलं बिनधास्त खेळतात. ज्या काळी आदिवासी शिक्षण शिकत नव्हता तुम्ही त्यांच्यात शिक्षणाची गोडी निर्माण केली आणि जगाच्या स्पर्धेत आता कुठे आदिवासी मुले- मुली येत आहेत.

१९७३ च्या आसपास लोक बिरादरी प्रकल्प हेमलकसाची स्थापना झाली. तुम्ही तिथे काम सुरू केले. तुटपुंजे साहित्य, वीज नाही, जंगल, विषारी प्राणी, पाऊस, वारा, थंडी, कडक उन्हाळा याचा साधा विचार केला नाही. हॉस्पिटल सुरू केले. आदिवासींचे अज्ञान आणि त्यात भाषेचा प्रश्न. तुम्ही माडिया भाषा अवगत केलीत. एकमेकांना समजून घेणे, संवाद साधने सोपे झाले. मग हळू हळू लोक तुमच्याकडे यायला लागले. कार्यकर्ते जमा होऊ लागले. जगन मचकले तर मुखेडचे. सोमनाथ श्रम शिबिरात गेले शिबीरात सामाजिक काम करण्याची प्रेरणाबाबांमुळे मिळाली तसेच बाबा आमटे यांचे काम पाहून झपाटून गेले. त्यांनी बाबांना विनंती केली मला तुमच्या सोबत काम करायचं आहे. बाबा म्हणाले हेमलकसाला जावं लागेल. जगन जे हेमलकसा येथे आलले. ऐन तारुण्यात ते गावाकडे परतले नाहीत. जगन आज तुमच्या सोबत कठीण काळात काम करू लागले असे अनेक जीवाभावाचे कार्यकर्ते आले. मनोहर यंपलवार, गोपाळ फडणीस, विलास मनोहर, दादा पांचाळ, बबन पांचाळ असे एक नव्हे अनेक कार्यकर्ते तुमच्या सोबत काम करत राहिले.आजही ते कार्य करत आहेत.

पुढे डॉ. दिगंत व अनिकेत मोठे झाले. दोघांचे लग्न झाले. तुम्हाला आधार मिळाला. दिगंतची पत्नी डॉ. अनघा ही स्त्री रोग तज्ञ आहे. आदिवासी भागात कुपोषण आहे. कुपोशीत बालके जन्मतात. गरोदर महिलांच्या मृत्यूचे प्रमाण बरेच होते. या पार्श्वभूमीवर डॉ. अनघा हा खूप मोठा आधार झाला. दिगंत व अनघा हॉस्पिटल सांभाळत असल्याने तुम्हाला व मंदाताईना उसंत मिळाली. कधी फिरण्यासाठी वेळ मिळत नव्हता आता तुम्ही कार्यक्रमाला बोलावले तर जाता. अनेक ठिकाणी तुमच्या मुलाखती झाल्या. आणि लोकांना हेमलकसा प्रकल्प कळायला लागला. पहिला कार्यक्रम मी दूरदर्शनवर पहिला. सिद्धार्थ काक व रेणुका शहाणे यांच्या सुरभी कार्यक्रमात तुमच्या कामाची, प्राण्यांनसोबतचे शूटिंग झाले. छोटी मुलाखत त्यांनी घेतली होती. तिथून तुमचे काम लोकांना कळायला लागले. समृद्धी पोरे यांच्या डॉ. प्रकाश बाबा आमटे या चित्रपटाने तर घरोघरी लोक बिरादरी प्रकल्पाचे काम व तुम्ही आणि मंदाताई पोहचला आहात. लोक मदत करत होते.

बाबा आमटे यांची जन्म शताब्दी वर्ष २६ डिसेंबर २०१४ साली सुरू झाले. त्याची सुरुवात अंबाजोगाईत झाली. स्वरानंदवनचा कार्यक्रम, दिलीप पेशवे यांचे बाबांच्यावर चरित्रात्मक भाषण, नरेंद्र मेस्त्री यांनी आनंदवन मित्र मंडळ मुंबईच्या वतीने मोठी डायरीची निर्मिती केली होती त्याचे प्रकाशन, बाबा व साधनाताई यांच्या मोठ्या चार बाय सहा फूट तैलचित्राचे अनावरण, व तो फोटो नंतर मी हेलकसाला भेट दिला. जो आज हॉस्पिटलच्या प्रवेश द्वारात काच बंद ठेवला आहे. समाधान याचे की पेशंट व इतर कार्यकर्ते, भेट देणारे पाहुणे आत जाताना नमस्कार करून आत जातो. तर बाबांच्या जन्म शताब्दीची सांगता हेमलकसा येथे २६, २७ व २८ डिसेंबर २०१५ रोजी तीन दिवस वेगवेगळे कार्यक्रम आयोजित करून झाली. अनिल काकोडकर त्यासाठी आले होते. ३ दिवस भरगच्च कार्यक्रम आयोजित केले होते. रात्री चंद्रकांत काळे निर्मित बाबा आमटे यांच्या कवितांवर आधारित कविता वाचन कार्यक्रम झाला. चंद्रकांत काळे यांनी खूप मेहनत त्यासाठी घेतली होती. दुसऱ्या दिवशी सकाळी कलापिनी कोमकली यांचं गायन झाले. त्यावेळी मी चार दिवस मी तिकडे होतो. मुक्ता टिळक, शैलेश टिळक, भारत जोडीचे साथी, लोक बिरादरी प्रकल्पाचे देशातून आलेले मित्र. अंबाजोगाई ते हेमलकसा असा त्या जन्मशताब्दी वर्ष वेगवेगक्या ठिकाणी वेगळे कार्यक्रम करुण साजरा झाला होता.

मी गेली ३८ वर्ष अंबाजोगाईला यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह चालवतो. त्याच ३० व्या समारोहाचे उदघाटन आपल्या व मंदाताईच्या हस्ते व्हावे अशी विनंती केली. तुम्ही तात्काळ होकार दिलात. पुण्याहून अंबाजोगाई व अंबाजोगाईहून हेमलकसा असा एक हजार पेक्षा जास्त किमीचा प्रवास तुम्ही केवळ माझ्या प्रेमा पोटी केलात. दुसरे कारण होते. एकमेव पुढारी असे होते ते म्हणजे यशवंतराव चव्हाण. त्यांनी आनंदवनला भेट दिली. बाबा व ताईंशी संवाद साधला. तोच धागा पकडून तुम्ही अंबाजोगाईला बोललात. महाराष्ट्र व आदिवासी यांची तुलना करताना आदिवासी अज्ञानी, अशिक्षित आहे पण प्रामाणिक. ही आदिवासींची तळमळ तुमच्या हृदयात आजही आहे, कायम राहील.

आज तुम्हाला तुमच्या कार्याची दखल महाराष्ट्र, देशाने तर घेतलीच पण आंतरराष्ट्रीय पातळीवरचे पुरस्कार तुम्हाला मिळाले. आशिया खंडातील नोबेल पुरस्कार मानल्या जाणाऱ्या रेमन मॅगसेसे पुरस्कार २९८४ मध्ये स्व. बाबा आमटे यांना मिळाला होता आणि नंतर २००८ मध्ये तुम्हाला व डॉ. मंदाकिनी आमटे यांना याच पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. एकाच परिवारात वडील, मुलगा आणि सून यांना मिळालेला हा सन्मान मिळणे हे कदाचित जगातील एकमेव उदाहरण असेल. बाबा आमटे ना पद्मश्री आणि पद्मविभूषण ने सन्मानित करण्यात आले होते. त्यानंतर तुम्हाला २००२ मध्ये पद्मश्री ने सन्मानित करण्यात आले .१९९५ मध्ये युरोपातील मोनॅको या देशाने तुम्ही व मंदाकिनी वहिनी यांचे फोटो असलेले पोस्टाचे स्टॅम्प काढून तुमच्या कार्याचा सन्मान केला. महाराष्ट्र शासनाचा आदिवासी सेवक पुरस्कार तुम्हा दोघांनाही अनेक वर्षांपूर्वी प्राप्त झाला आहे व नंतर असे अनेक पुरस्कार तुम्हाला मिळाले.

तुम्ही एकटे कधी प्रवास केला नसेल? आपल्या सोबत सतत मंदाताई असतात. खांद्याला खांदा लावून तुमच्या प्रत्येक निर्णयात त्यांचा वाटा आहे. सुख,दुःख, बऱ्या वाईट प्रसंगात तुम्हाला त्यांची साथ मिळाली. अलीकडे तुम्हाला अनिकेत प्रशासन, लोकांशी संवाद, प्रकल्प लोकांपर्यंत पोहचवणे, इतर अनेक कामात तो आता मजबूत आधार झाला आहे. त्याची पत्नी समीक्षा ही सर्व शाळा, शिक्षण व इतर बाबी बघत असते. तुम्हाला बिनधास्त कामानिमित्त फिरायला पूर्ण मोकळीक मिळाली आहे. आरोग्य, शिक्षण, आदिवासींच्या विकासासाठी गडचिरोली जिल्हाभर तलाव खोदून पाणी उपलब्ध करून दिले जात आहे. ही सगळी कामे अनिकेत समाधानकारकरित्या करीत आहे. पुर्वी व आताही आदिवासी, प्राणि, किडेमुंग्या,उंदरे खात. आता शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे. लोक नौकरी करू लागले आहेत. त्यांच्यातील प्रगतीचे समाधानकारक पाऊले पडत आहेत. हे केवळ पाच दशके तुम्ही व कार्यकर्ते घट्टपाय रोवून आहेत म्हणून ही सगळी प्रगती होत आहे.

प्रकल्पाच्या सुरुवातीला खूप खस्ता खाल्ल्या आहेत. पावसाळ्यात नद्या तुडुंब भरून वाहत असत त्यामुळे चार महिने सगळाच संपर्क होत नसे. रस्ते नव्हते, वीज नव्हती अशा कठीण कालखंडात हा प्रकल्प बाबांच्या प्रेरणेने आपल्या मूळे उभा राहिला. अशा वेळी डॉ. विकासभाऊ आमटे आपल्यासोबत सावली सारखे उभे होते. कधी कधी स्वतः ट्रक चालवत हेमलकसाला साहित्य पुरवायचे. आता आधुनिक व प्रगत जगात जग काम करतय पण आजही शहरी जीवनाचा तुम्हाला व तुमच्या तीसऱ्या, चौथ्या पिढीलाही मोह होत नाही या निष्ठेला सलाम आहे.

आमटे कुटुंबाची तिसरी पिढी आनंदवन व हेमलकसा येथे सक्षमपणे काम करते आहे. स्व.शीतल व कौस्तुभ आमटे यांनी आनंदवन, सोमनाथ, मूळगव्हाण असे प्रकल्प सक्षमपणे चालवले. इकडे आरोग्य डॉ. दिगंत व डॉ. अनघा व शिक्षण समीक्षा तर प्रशासकीय कामा सोबत इतर प्रकल्प व समाज संवाद अनिकेत खूप चांगला सांभाळत आहे. अर्णव, आहन, निर्झर अस्मि, रावी हे किती संस्कारित झाले आहेत हे मी व समाज पहात आहे. तुम्ही दोघे भाऊ व दोघी वहीनी यांचं वय आता सत्तरच्या पुढेच आहे. त्यात तुम्हाला एका दुर्धर आजाराने ग्रासले आहे. पण आधुनिक जगात रोज आरोग्य विषयक संशोधन नवे नवे होत आहे. आहे प्रगत उपचार व औषधी उपलब्ध होत आहे. तुमच्यावर मनातून लोक प्रेम करतात. त्यांच्या सदिच्छा तुमच्या सोबत आहेत. हे पत्र लिहिताना अनेक आठवणी मनात आहेत. कांही लिहिताना विसरलेल्याही असतील. लिहिलेले सुद्धा तोकडे आहे. तुमच्या मनाचा मोठेपणा, साधी राहणी, आणि पराकोटीचा उच्च विचार हा आमचा आदर्श आहे.

मी आपल्याला उत्तम आरोग्य व उत्तम आयुष्य चित्तींतो! दीर्घ आयुष्याची कामना करतो आणि थांबतो!

**दगडू लोमटे,अंबाजोगाई**

# प्रकाशभाऊ



प्रकाशभाऊ व लोकबिरादरी या एका नाण्याची दोन बाजू असे म्हटले तर ते सयुक्तिक ठरेल.

प्रकाशभाऊ म्हणजे धाडस आणि युक्तीने काम करणे याचा सुंदर मिलाफ ! तसेच आहे त्या परिस्थितीवर विनोद करून वातावरणातील ताण हलका करण्याची खास हातोटी त्यांच्याकडे आहे. तसेच स्पष्टवक्तेपणाही त्यांच्या स्वभावाचा एक पैलू आहे. ती.बाबा आमटे आणि सौ.साधनाताई आमटे यांचे समाजकार्यातील अपार कष्ट व अभावात सुध्दा समाधानाने जगायची वृत्ती याचे न सांगता झालेले संस्कार पदोपदी अनुभवायला येतात.आणि मग हेमलकसा येथील कामाची जबाबदारी स्विकारल्यावर टोकाच्या अभावाच्या परिस्थितीला तोंड द्यावे लागले. घनदाट जंगल त्यात विदर्भातले विषम हवामान, राहायला जेमतेम झोपडी, वीज नाही, संपर्कासाठी फोन नाही, वर्षातील सहा महिने इतर जगाशी संबंध टिकवता येत नसे . कारण एकदा पाऊस सुरू झाला की, आलापल्ली ते हेमलकसा या तथाकथित रस्त्यावर एक नदी व अनेक नाले ठिकठिकाणी तुडूंब भरून व्हायचे. मग दळणवळणाचे कोणतेच साधन पोहेचू शकत नव्हते. यासाठी पावसाळ्यापूर्वी जीवनावश्यक व टिकून राहतील असे - धान्य म्हणजेच तांदूळ व डाळ , तिखट,मीठ मसाला इत्यादी, औषधे ,अशा नाना गोष्टी साठवून ठेवायला लागायच्या. इतरत्र काय चालले आहे ते समजण्यासाठी रेडिओ एकच साधन होते व तो चालवण्यासाठी बॅटरी सेल, जे गरजेनुरूप टॉर्चमधेही वापरता यायचे. कंदीलासाठी रॉकेल हे एक जीवनावश्यक साधन, अशा मोजक्या साधनसामग्रीत जीवन जगावे लागले तरी कधी तक्रार नसायची.तेव्हा त्यांच्या जोडीने सौ.मंदावहिनींनीही ह्या सगळ्या परिस्थितीत त्यांच्यासोबत राहिल्या व त्यांनी जी साथ दिली त्याला तोड नाही.

प्रकाशभाऊ व मंदावहिनी दोघे डॉक्टर झालेले आणि आदिवासींना आपल्या ज्ञानाचा उपयोग करून द्यायला आलेले तर तिथेही सुरूवातीला कोणी यायचेच नाही. याला एकतर आदिवासींची जीवनपद्धती ,ज्यात वैदू,मांत्रिक वगैरेवर भरवसा याचा मोठा अडसर होता.आधी या सगळ्यांनी हात टेकले आणि कधी परिस्थिती हाताबाहेर गेली वा रूग्णाची तब्बेत गंभीर झाली की मग हेमलकश्याला रूग्ण यायचे. अशी आणिबाणीची परिस्थिती सांभाळणारी कोणतीच वैद्यकीय सोय नसताना या रूग्णांवर उपचार केले. मग हे रूग्ण बरे झाले तसतसा लोकांचा विश्वास बसायला लागला.आणि मौखिक प्रसिद्धीच्या आधारे रूग्ण संख्या आस्तेआस्ते वाढत गेली.

हा विश्वास संपादन केल्यावर मग आदिवासी इतर समस्या घेऊन येऊ लागले.त्यामध्ये आदिवासींना फसवण्याच्या बाबी खूप असायच्या. त्यात्या विषयानुरूप ते प्रश्न धसास लावण्याचे काम प्रकाशभाऊ व सहकारी कार्यकर्ते यांनी केले.एका बाजूला वेगवेगळे सरकारी अधिकारी फसवणूक करायचे तर दुर्सय़ा बाजूला व्यापारी आदिवासींच्या अज्ञानाचा फायदा घ्यायचे.यावर मात करण्यासाठी वॅगनभर मीठ आणून ना नफा ना तोटा तत्वाने त्याची विक्री केली.तद्वतच जिल्हधिकार्य़ांकडून आवश्यक परवानगी मिळवून रॉकेल वितरण केले. मग शिक्षण देऊन आदिवासींच्या पुढच्या पिढीतील अज्ञान दूर करायच्या उद्देशाने शाळा काढली.तिथे सुरूवातीला विद्यार्थ्यांची वानवा होती.पण शिक्षकांनी केलेल्या कामाला प्रतिसाद मिळायला सुरूवात झाली .त्यातून शाळेतील विद्यार्थी हा दुवा पकडून शेतीचे धडे दिले व शास्त्रीय पद्धतीने शेती करायची सवय लावली.योग्य बियाणे उपलब्ध करून दिले.तरी ते बियाणे मोफत न देता जेवढे बियाणे दिले, तेवढे पीक आल्यावर, परत आणून द्यायची सवय लावली. पाण्यासाठी हातपंप लावल्यावर ते नादुरूस्त व्हायचे.ते दुरूस्त करणारी यंत्रणा वा व्यवस्था नव्हती, त्याचे तंत्र शिकून घेऊन तीही सोय लोकबिरादरीच्या कार्यकर्त्यांनी दिली. ही झाली मोजकी उदाहरणे अशी अनेक उपयुक्त कामे लोकबिरादरी प्रकल्पाने केली. ही सगळी कामे करत असताना रेणूकाताई व विलास मनोहर, मनोहर एपंलवार,बबन पांचाळ, गोपाळ फडणीस व प्रभा फडणीस, मुकंद व वासंती दिक्षीत, दादा पांचाळ अशी अनेक कार्यकर्त्यांनी मोलाची साथ दिली.आनंदवनातील कुष्ठरूग्णांनी दवाखाना,घरे,शाळा,वसतिगृह अशा इमारती बांधून दिल्या.इतर काही पुरवठा आनंदवन सोमनाथ येथून केला जात होता.

हा असा भक्कम पाया रचल्यावर या विधायक कार्याला समाजाचा भरभक्कम पाठिंबा मिळाला व मिळत आहे.त्यामुळे हॉस्पिटलची अद्ययावत सुसज्ज सोय आणि बारावीपर्यतची निवासी शिक्षणाची सोय हेमलकसा येथे उभी आहे.तसेच गावकर्.यांच्या मागणीनुसार दोन शाळा त्यापण इंग्रजी माध्यमात शिक्षण देर्णाय़ा या भागात संस्थेने सुरू केल्या आहेत. गावतलाव करून देऊन शेतीसाठी वा मत्स्यपालनासाठी चांगली व उपयुक्त सोय अनेक गावात उभारून देता आली आहे. या सगळ्या कामात आता त्यांच्या मुलगे व सूना - डॉ.दिगंत,डॉ.अनघा ,अनिकेत व समीक्षा यांनी स्वत:ला झोकून दिले आहे.ही न बोलता केलेल्या संस्काराची व समाधानाची गोष्ट आहे.ही सुफळ कहाणी अशीच अव्याहत सुरू राहो ही सदिच्छा व्यक्त करून डॉ.प्रकाश भाऊंना पंच्चाहत्तराव्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देत दीर्घायुरोग्य लाभो असे चिंतितो.

# राष्ट्रीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेसाठी चंद्रपूरनगरी सज्ज

## पालकमंत्री ना.श्री.सुधीर मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनात तयारी पूर्ण

### विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण, शहरातील सौंदर्यीकरणाने नागरिकांमध्ये चैतन्य

### राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेला अभिनेते सलमान खान यांच्या शुभेच्छा अन् कैलाश खेर यांचे थीम साँग








**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य मंत्री तसेच चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनात ६७ व्या राष्ट्रीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेची तयारी पूर्ण झाली आहे. 'मिशन ऑलिम्पिक २०३६' हे एकच ध्येय्य डोळ्यांपुढे ठेवून आयोजित करण्यात आलेली ही स्पर्धा मंगळवार, २६ डिसेंबरला बल्लारपूर येथील तालुका क्रीडा संकुलात सुरू होणार आहे. या स्पर्धेच्या निमित्ताचे चंद्रपूरनगरीचा चेहरामोहरा बदलला आहे. विविध चौकांचे सौंदर्यीकरण झाले असून नानाविध संकल्पनावर आधारित रंगबेरंगी चित्रांनी भिंती फुलल्या आहेत. अखिल भारतीय स्तरावरील या स्पर्धेसाठी चंद्रपूरनगरी सज्ज झाली आहे. देशगौरव,पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी २०३६ मध्ये भारतात ऑलिम्पिक स्पर्धा घेण्याचा संकल्प केला आहे. त्यामुळे मिशन ऑलिम्पिकच्या निमित्ताने उत्कृष्ट खेळाडू घडविण्याचे उद्दिष्ट ठेवूनच बल्लारपूर येथे होणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचे नियोजन करावे, असे निर्देश राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी दिले आहेत. त्यानुसार, संपूर्ण तयारी झाली आहे. २६ ते ३१ डिसेंबरदरम्यान होणाऱ्या या स्पर्धेसाठी देशातील सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधून जवळपास ३ हजार खेळाडू, त्यांचे मार्गदर्शक, पंच, पालक, क्रीडा प्रशिक्षक आदी लोक सहभागी होणार आहेत. त्यांच्या भोजनाची आणि निवासाची उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच ही स्पर्धा उत्कृष्टरित्या पार पडावी यासाठी आयोजन समिती, उद्घाटन समिती, स्वागत समिती, निवास व्यवस्था समिती, मदत कक्ष, भोजन समिती, क्रीडा कार्यक्रम व तक्रार निवारण समिती, स्थानिक पर्यटन समिती, प्रसिद्धी आणि पायाभूत सुविधा समिती, वाहतूक व्यवस्था समिती, सांस्कृतिक कार्य समिती, सुरक्षा समिती स्वच्छता समिती आदी समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. यासंदर्भात वने, सांस्कृतिक कार्य मंत्री तसेच चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी वेळोवेळी आढावा घेऊन समायोजित निर्देश प्रशासनाला दिले आहेत. त्यानुरूप स्पर्धेचे नियोजन करण्यात आले आहे.

**अभिनेते सलमान खान यांच्या शुभेच्छा**

भव्य अशा ६७ वी राष्ट्रीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेसाठी प्रसिद्ध अभिनेते सलमान यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. वने, सांस्कृतिक कार्य मंत्री तसेच चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनात बल्लारपूर येथील क्रीडा संकुलमध्ये होणारी ही स्पर्धा यशस्वी व्हावी, अशी भावना अभिनेते सलमान खान यांनी त्यांच्या शुभेच्छापर संदेशातून व्यक्त केली आहे. त्याचसोबत जयंत दुबळे आंतरराष्ट्रीय जलतरणपटू, रोहिणी राऊत ,माधुरी गुरनुले,
ज्योती चव्हाण आंतरराष्ट्रीय धावपटू , सायली वाघमारे अथलेटिक्स परीक्षक यांनी देखील या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या आहेत.

**थीम साँगला कैलाश खेर यांचे स्वर**

६७ व्या राष्ट्रीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेसाठी थीम साँग तयार करण्यात आले आहे. या गाण्याला प्रसिद्ध पार्श्वगायक कैलाश खेर यांनी आवाज दिला आहे. 'आओ चंद्रपूर, खेलो चंद्रपूर... खेलो ऐसा दिल लेलो चंद्रपूर...' असे शब्द असलेले हे गीत विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाची पेरणी करणारे ठरत आहे. लक्षवेधक शब्द, जोशपूर्ण संगीत आणि कैलाश खेर यांचा भावगर्भित आवाज ही या थीम साँगची वैशिष्ट्ये ठरत आहेत.

**सूर्यनमस्कारातील मुद्रा, रंगबेरंगी भिंती, उड्डाणपूलावर रोषणाई**

६७ व्या राष्ट्रीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेच्या निमित्ताने चंद्रपूर शहरातील उड्डाणपूलावरील दिव्यांवर तिरंगा रोषणाई करण्यात आली आहे. प्रमुख चौकांचे सौंदर्यीकरण झाले आहे. रस्त्याच्या मधोमध असणाऱ्या दुभाजकावर सूर्यनमस्कारातील मुद्रा दर्शविणाऱ्या शिल्पाकृती बसविण्यात आल्या आहेत. रंगबेरंगी चित्रांनी भिंती रंगविण्यात आल्या आहेत. जणू काही दिवाळी असल्यासारखे चंद्रपूर शहर सजविण्यात आले आहेत.

## क्रीडा स्पर्धेनिमित्त आयोजित बाईक रॅलीला नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नातून जिल्ह्यात राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन होत आहे. या निमित्ताने जिल्ह्यात विविध राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातून खेळाडू येण्यास सुरवात झाली आहे. या खेळाडूंचा उत्साह वाढविण्यासाठी तसेच क्रीडा स्पर्धेचा ज्वर वाढवून वातावरण निर्मितीकरीता पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या सुचनेवरून जिल्हा प्रशासनाच्यावतीने आज (दि.२५) चंद्रपूर व बल्लारपूर या शहरात बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. रॅलीत नागरिकांनी स्वत:हून मोठ्या प्रमाणात सहभागी होत उत्स्फुर्त प्रतिसाद नोंदविला.बाईक रॅलीला सुरवात होण्यापूर्वी जिल्हाधिकारी विनय गौडा म्हणाजे, दिनांक २६ ते ३१ डिसेंबर या कालावधीत बल्लारपुर क्रीडा संकुलात होणाऱ्या राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे. या क्रीडा स्पर्धेबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले असून चंद्रपूरचा नावलौकीक देशभरात होण्यासाठी या कार्यक्रमात सर्वांनी सहभागी होऊन स्पर्धा



यशस्वी करण्यासाठी प्रत्येकाने आपले योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.सदर रॅलीला जिल्हा क्रीडा संकुल येथून सुरूवात करण्यात आली. ही रॅली पुढे वरोरा नाका, प्रियदर्शनी चौक, जटपुरा गेट, माता महाकाली मंदिर, बल्लारपूर शहर, ब्राह्मणी फाटा या मार्गाने विसापूरपर्यंत पोहचली. तालुका क्रीडा संकुल बल्लारपूर येथे रॅलीचा समारोप झाला. यावेळी उपस्थितांनी माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त बल्लारपूर येथील क्रीडा संकूलात असलेल्या वाजपेयी यांच्या पुतळ्याला अभिवादन केले.रॅलीत जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्यासह जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी, सहायक जिल्हाधिकारी मुरुगानंथम एम., उपवनसंरक्षक श्वेता बोड्डू, जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश पुंड, राहुल पावडे, डॉ. मंगेश गुलवाडे, ब्रिजभूषण पाझारे तसेच विविध विभागाचे अधिकारी-कर्मचारी व क्रीडा संघटनांचे पदाधिकारी सहभागी झाले होते.

## नाताळ सण प्रेम, शांती आणि करूणेचा संदेश घेऊन येता – देवराव भोंगळे

### भाजपकडून घुग्घुस येथील विविध चर्चना भेटी व ख्रिस्ती धर्मीयांना शुभेच्छा

**घुग्घुस । प्रतिनिधी**

नाताळच्या (ख्रिसमस) निमित्ताने शहरातील न्यू अपोस्टोलिक, एस. टी.थॉमस सी. आय. एन, बिलिवर्स आणि शालोम गोस्पेल या चर्चमध्ये राजुरा विधानसभेचे निवडणूक प्रमुख तथा माजी जि. प. अध्यक्ष देवराव भोंगळे यांच्या नेतृत्वात शहर भाजपकडून भेटी देत उपस्थित ख्रिस्ती धर्मीयांना शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी भाजयुमोचे प्रदेश उपाध्यक्ष विवेक बोढे, पोलिस निरिक्षक आसिफ राजा शेख, माजी सरपंच संतोष नुने, माजी जि. प. सदस्य चिन्नाजी नलभोगा, विनोद चौधरी, माजी ग्रा. पं. सदस्य साजन गोहने, सिनु इसारप, हसन शेख, सुरेंद्र जोगी, मारोती वांढरे ,विजय पचारे यांचेसह ठिकठिकाणी मोठ्या संख्येने ख्रिस्ती बांधवाची उत्साहपूर्ण उपस्थिती पाहायला मिळाली.याप्रसंगी न्यू अपोस्टोलिक चर्च मध्ये शुभेच्छापर बोलतांना देवराव भोंगळे म्हणाले की, ख्रिस्ती धर्मीयांचा महत्वपूर्ण सण असलेला नाताळ हा संपुर्ण जगभर मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो; खरंतर प्रभू येशूच्या जन्माचा आनंद द्विगुणित करीत साजरा



होणारा नाताळ प्रेम, शांती आणि करूणेचा संदेश घेऊन येतो. भारतात अनेक जातीधर्माचे लोक एकत्र राहतात अगदी त्याचप्रमाणे आपल्या घुग्घुस शहरातही देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेले सर्व धर्माचे बांधव मोठ्या गुण्यागोविंदाने एकोप्यात राहतात. सर्व धर्माचे सणोत्सव आपण सर्व मिळून साजरे करतो, एकमेकांच्या सुखदुःखात सामिल होतो त्यामुळे संबंध चंद्रपूर जिल्ह्यातही सामाजिक समरसतेचे द्योतक म्हणून घुग्घुस शहराची ओळख आहे. हे निश्चितच आपल्या सर्वांसाठी गौरवास्पद आहे. पुढे बोलताना, जे भक्त प्रभू येशू मसिहा प्रती श्रद्धा ठेवतात त्यांना कायम चांगले कार्य करण्याची सकारात्मक उर्जा मिळते. घुग्घुस शहराच्या विकासासाठी देखील आम्हाला निमित्यमात्र ठेऊन प्रभूने शहरवासीयांची सेवा करण्याची आम्हाला संधी दिली आहे. सेवा आणि करूणेच्या याच तत्वावर आजही आमचे सामाजिक कार्य अव्याहतपणे सुरू आहेत. कालपासून आपण सर्व ख्रिस्ती बांधवांनी या आनंददायी नाताळची सुरुवात केली, काल घुग्घुस शहरामध्ये मिरवणुक काढून संपूर्ण शहरात प्रसन्नतेचे वातावरण निर्माण केले त्याबद्दल सर्वांचेच अभिनंदन करीत पुणःश्र्च सर्वांना नाताळच्या मनापासून शुभेच्छा देतो. असेही ते म्हणाले.

## 'हद्द २' एक अनहोनी घटना चित्रपटाचे चित्रीकरण बेहद्द आनंदाचा वातावरणात वेगात सुरू

> **चंद्रपुरातील विभिन्न क्षेत्रातील नामवंतांनी चित्रीकरणासाठी असलेल्या जागेवर प्रत्यक्ष भेट देऊन कलावंतांना शुभेच्छा प्रदान केल्या यामध्ये चंद्रपूर महानगरपालिका आयुक्त विपिन पालीवाल, माजी उपमहापौर राहुल पावडे, शिक्षक संघाचे आमदार सुधाकर अडबाले,योग नृत्य संस्थापक गोपाल मुंदडा असे एका पत्रकान्वये प्रसिद्धी प्रमुख प्रकाश परमार यांनी कळविले आहे.**



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूरच्या प्रथम चंद्रपुरी चित्रपट ''एक'' मर्यादाच्या अपूर्व यशाने भारावून व चंद्रपूरकरांची आग्रहाची मागणी लक्षात ठेवून 'हद्द २' एक अनहोनी घटना या दुसऱ्या चित्रपटाची निर्मिती राज्याचे संस्कृती व मत्स्यव्यवसाय मंत्री नामदार सुधीर मुनगंटीवार व जिल्हा पोलीस अधीक्षक रवींद्र सिंग परदेसी यांच्या साक्षीने मुहूर्त करून चित्रपट चित्रीकरण सुरू झाले आहे .

एक पारिवारिक कथा चित्रपटाच्या विषय असून पूर्णपणे सर्वच कलावंत चंद्रपूरकरच आहे . चित्रपट निर्माता सुदेश भालेकर व देवा रमेश बुरडकर , प्रीतम ईश्वर खोब्रागडे हे त्रिकूट असून त्यांना प्रशांत कक्कड ,संजय रामटेके ,प्रजेस घडसे अश्या दिग्गज नाट्य कलावंतांची साथ लाभली आहे .

चित्रपटाचे चित्रीकरण जगन्नाथ बाबा मठ शेजारी, पठाणपुरा, सितारा बारमागे , वन भवन नागपूर रोड सारख्या परिसरात सुरू असून चंद्रपूरच्या नागरिकांचे भरपूर सहयोग व अपार प्रेम याचा अनुभव पावलो पावली लाभत आहे . चित्रपटातील अनेक पात्र म्हणून चंद्रपुरातील जानते चेहरे यात अभिनय करीत आहे . ज्यामध्ये काही नवोदित कलावंत सुद्धा प्रथमच अभिनय करत आहे. कलावंताची फेरहिस्त अशी आहे गौरव भट्टी , कल्याणी भट्टी,बलराम सिंग सेंगर ,स्नेहल राऊत, भार्गव खोब्रागडे, जोशना निमगडे , मृणाली कांबळे, सुयोग अवथरे , राजू खोब्रागडे , विनोद धकाते, जय अंड्रस्कर , अमित शास्त्रकार, रमेश तांडी , प्रदीप निमगडे , रोशन गजभिये , नम्रता पित्तुलवार, गणेश साळवे , तरुण विश्वास, प्रज्ञा जीवनकर, सुशांत भांडारकर, रमेश खातखेडे, नरेश बुरडकर, एकता पितुलवार , धनंजय तावडे, प्रकाश परमार इत्यादी कलावंतांच्या अभिनयाने हा चित्रपट साकार होतोय .

यांचा सुरेख अभिनय चंद्रपूरकरांना नक्कीच भावेल चित्रपटात तीन गाणी असून लवकरच यातील गाणी आपणास बघायला व ऐकायला मिळेल चित्रीकरण शेवटच्या टप्प्यात असून मार्च २०२४ होळीच्या मुहूर्तावर हा चित्रपटगृहात दाखल होईल असा मानस आहे.

## सेंट जॉन हायस्कूल पुलगाव येथे क्रिडा सप्ताहाचा समारोप



**पुलगाव । प्रतिनिधी**


स्थानिक यशबोध ज्ञान प्रबोधिनी द्वारा संचालित सेंट जॉन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालया येथे क्रिड़ा सप्ताहाचे आयोजन दि. १८ डिसेंबर पासुन प्रारंभ होऊन दि. २३ डिसेंबरला त्याचा समारोप करण्यात आला. वर्ग ३ ते १२ च्या विद्यार्थामध्ये ही क्रिडा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. आणि दोन शिफ्ट मध्ये विभागण्यात आली होती.

कार्यक्रमाचे मुख्य अतिथी म्हणून अमोल इंगोले आणि पद्माकर देशमुख हे होते. कार्यक्रमाला शाळेचे प्रबंध संचालक चंद्रशेखर इंगळे, प्राचार्य संतोष यादव, उपप्राचार्या आरती कुरझडकर यांची प्रमुख उपस्थिती होती.संपूर्ण सप्ताहात वेगवेगळ्या क्रिडास्पर्धा घेण्यात आल्या. त्यात लंगडी, कबड्डी, रनींग,सॅक रेस अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या. कर्मा हाऊस, उपासना हाऊस,भक्ती हाऊस आणि ज्ञान हाऊस या चार गटात, स्पर्धा जुंपली होती. विजयी संघाला पाहुण्यांच्या हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले.उपस्थित पाहुण्यांनी आपल्या मार्गदर्शनपर संदेशात सांगितले की, विदयार्थी जीवनात फक्त अभ्यास एके अभ्यास आणि फक्त खेळातच गुंतून न राहता, अभ्यास आणि खेळ या दोन्ही गोष्टींचा व्यवस्थित समतोल ठेवला पाहिजे. तरच भविष्यातील आपली वाटचाल यशस्वी आणि सफल होईल.संपूर्ण खेळाचे व्यवस्थापन शाळेचे क्रिडा- शिक्षक सत्यम कोथळकर, वैभव शिरभाते आणि निलिमा मांडगावकर यांनी केले.आणि संपूर्ण खेळाला मनोरंजक बनविले.कार्यक्रमाचे संचालन प्राची दंतेवार, श्रेयस पटले, क्रिष्णा धांदे आणि सुहान सांगोले ने केले, तर आभार प्रदर्शन अविष्कार उपाध्ये आणि ऋषी गुप्ता ने केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे संपूर्ण शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सुद्धा आपला हातभार लावला.

# लोकबिरादरी प्रकल्पाचा सुवर्णमहोत्सवी वर्धापनदिन विविध उपक्रमांनी साजरा

## मान्यवरांनी व्यक्त केली आमटे कुटुंबाप्रति कृतज्ञता












**लोकबिरादरी/हेमलकसा (डॉ.यशवंत घुमे)– जवळच्या निबिड अरण्यात कर्मयोगी बाबा आमटे यांनी ५० वर्षांपूर्वी २३ डिसेंबर १९७३ ला हेमलकसा येथे लोकबिरादरी प्रकल्प नावाने सेवाकेंद्र सुरु केले.सुप्रसिद्ध समाजसेवक डॉ.प्रकाश आमटे व डॉ.मंदाकिनी आमटे या उभयतांची कर्मभूमी असलेला लोकबिरादरी प्रकल्प २३ डिसेंबरला ५० वर्षाचा झाला.त्यामुळे सुवर्ण महोत्सवी वर्धापनदिनाचा तीन दिवसीय कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी विविध प्रकारच्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी लोकबिरादरी प्रकल्पांचे कार्यावर अभ्यासपूर्ण भावना व्यक्त करीत आमटे कुटुंबाप्रति कृतज्ञता व्यक्त केली.**

सर्वप्रथम मान्यवरांचे हस्ते स्व.बाबा व स्व.साधनाताई आमटे यांच्या प्रतिमांना पुष्पहार घालून दीपप्रज्वलित करण्यात आले.यावेळी महारोगी सेवा समिती वरोरा चे सचिव डॉ.विकास आमटे, डॉ.प्रकाश आमटे, डॉ.मंदाकिनी आमटे, दीनानाथ मंगेशकर रुग्णालय, पुणे यांचे संचालक व विश्वस्त डॉ.धनंजय केळकर, मानसोपचार तज्ज्ञ, रेमन मॅगसेसे पुरस्कृत तथा श्रद्धा फाउंडेशन, कर्जतचे संस्थापक डॉ.भरत वाटवाणी,२०१८ च्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख,स्त्रीरोग व प्रसुती शास्त्र तज्ज्ञ तथा वैद्यकीय अधीक्षक, उपजिल्हा रुग्णालय अहेरीचे डॉ.कन्ना मडावी इत्यादी मान्यवर उपस्थित होते.प्रसिद्ध सतार वादक पं.रविशंकर यांचे शिष्य पं.परिमल सदाफळ यांच्या सुमधुर सतार वादनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. श्रध्देय बाबा आमटे व डॉ.प्रकाश आमटे यांचेकडून समाजसेवेची प्रेरणा घेऊन मी माझे जीवन समाजसेवेसाठी अर्पण केले. यापुढेही सेवा सुरूच राहील. सुरुवातीला त्रास झाला. मात्र मी आमटेंचा आदर्श समोर ठेवून माझे कार्य सुरू ठेवले.लोकबिरादरी प्रकल्पाने आज अविरत सेवेची ५० वर्षे पूर्ण केली, याचा मला अत्यानंद होत आहे. अशा आशयाचे मनोगत डॉ.भरत वाटवाणी यांनी व्यक्त केले. डॉ.धनंजय केळकर यांनी याप्रसंगी बोलताना सांगितले, डॉ.प्रकाश व डॉ.मंदाकिनी आमटे या उभयतांचे कार्य महान आहे. समाजाच्या सेवेसाठी त्यांनी स्वतःला झोकून दिले. स्वत:साठी न जगता ते दुसऱ्यांसाठी जगत आले. त्यांच्या जीवनात अनेक संकटे आली.रक्ताच्या कॅन्सरसारख्या दुर्धर आजाराने डॉ. प्रकाश यांना ग्रासले. तेव्हा आम्ही सर्व डॉक्टर्स चिंतेत होतो. मात्र आमचे प्रयत्न, असंख्य चाहत्यांचे आशीर्वाद व प्रार्थनांनी तथा लोकबिरादरी प्रकल्पाच्या वन्यजीव अनाथालयातील प्राण्यांचे प्रेम यामुळे ते पूर्णपणे बरे झाले.समाजसेवा करणे सोपे नाही, ते सुद्धा ५० वर्षे. त्यासाठी संपूर्ण कुटुंबाची साथ हवी असते.ती त्यांना मिळाली. आज आमटेंची तिसरी पिढी याच कार्यांत गुंतली पाहून त्यांच्या कार्याला सलाम करुन सुवर्ण महोत्सवी वर्धापनदिनाच्या शुभेच्छा दिल्या. स्थानिक डॉ.कन्ना मडावी यांनी त्यांच्या जीवनात लोकबिरादरी प्रकल्पाचे योगदान विषद करतांना म्हणाले, मी पहिलीपासून ते सातवीपर्यंत लोकबिरादरीच्या आश्रम शाळेत शिकलो. पुढे डॉ.प्रकाशभाऊंच्या पुढाकाराने मी या परिसरातील माडीया जमातीचा पहिला डॉक्टर झालो. लोकबिरादरी प्रकल्प नसता तर मी डॉक्टर होऊच शकलो नसतो. माझ्या जीवनात लोकबिरादरी प्रकल्पाचे व डॉ.प्रकाशभाऊंचे फार मोठे योगदान आहे. हे सांगताना येथील शाळेतील लहानपणीच्या आठवणी आणि अडचणी सांगितल्या. साहित्यिक लक्ष्मीकांत देशमुख यांनी आमटेंचा त्याग आणि समर्पण यांवर प्रकाश टाकला.लोकबिरदरी प्रकल्पाचे कार्य व योगदान सांगून सुवर्ण महोत्सवी वर्धापनदिनाच्या शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमात विदर्भातील वाचकप्रिय दैनिक सह्याद्रीचा राखणदार तर्फे लोकबिरादरी प्रकल्पाचा मागोवा घेणाऱ्या विशेष पुरवणीचे मान्यवरांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. कोल्हापूर येथील डॉ.राजश्री पाटील यांच्या ' आणि चांदणे उन्हात हसले.' या डॉ.मंदाकिनी आमटेंवर लिहिलेल्या व अमित कोहली यांनी डॉ.प्रकाश आमटे वर लिहिलेल्या पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. याचदिवशी दुपारी ३ वाजता डॉ. प्रकाश आमटे, डॉ. मंदाकिनी आमटे यांची प्रकट मुलाखत घेण्यात आली. उभयतांच्या जीवनातील ५० वर्षाचा प्रवासपट डॉ. मंदार परांजपे यांनी आपल्या खुमासदार शैलीने उलगडायला मदत केली. यावेळी डॉक्टर दाम्पत्याने प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून झालेल्या प्रकटीकरणात आपल्या आयुष्यातील अनेक पैलू उलगडून दाखविले. सायंकाळी ६ वाजता दास्ता – ए-रामजी श्री अक्षय शिंपी व नेहा कुलकर्णी श्री दि..बा मोकाशी लिखीत 'आता आनोद सुनासि आले' ही कथा 'दास्तांगोई' प्रकट प्रकारात सादर करण्यात आली.सायंकाळी आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांनी मल्लखांबाची चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर केली. रात्री ८ वाजता श्री इडागुंजी महागणपती यक्षगान मंडळी केरेमणी यक्षगान या कर्नाटकातील पारंपारिक लोककलेद्वारे रामायणातील सीताहरण हा प्रसंग सादर करण्यात आला. कलाकारांच्या आंगिक,वाचिक अभिनयाने उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फिटले.उत्सवाच्या पहिल्या दिवशी डिसेंबरला सायंकाळी ५ वाजता पारंपारिक आदिवासी नृत्य कथेने सुवर्ण महोत्सवी कार्यक्रमाची शानदार सुरुवात झाली. यावेळी समूह नृत्याच्या माध्यमातून केलेल्या सादरीकरणाने उपस्थितांची वाहवा मिळविली. त्यानंतर सायंकाळी ६ वाजता 'सूर प्रकाशाचे, सूर्य विकासाचे' हा सुरेल व्हायलिन वादनाचा अनोखा कार्यक्रम सादर करण्यात आला. सुझुकी स्कूल ऑफ व्हायोलिन पुणे संचालिका सौ.रमा चौभे आणि त्यांच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या इंग्रजी , मराठी, हिंदी भाषांतील विविध सुरेल गीतांनी उपस्थितांची वाहवा मिळविली. प्रेक्षकांच्या आवडीची गाडी पुन्हापुन्हा वन्समोअर वाजविण्यात आली. त्यानंतर रात्री ८ वाजता आख्यायिका निर्मित गावकथा (बालाजी सुतार यांच्या कविता, कथा आणि ललित गद्यांवर आधारित नाटच सादरीकरण) करण्यात आले.कार्यक्रमाच्या शेवटच्या दिवशी सकाळी ८ वाजता भव्य वृक्षदिंडी काढण्यात आली.रस्त्यांच्या दुतर्फा विविध प्रकारच्या रंगीबेरंगी पानाफुलांनी सजविलेल्या रस्त्यावरील रांगोळ्या आणि शालेय विद्यार्थ्यांना मिळालेले पुरस्कार हे या वृक्षदिंडीचे विशेष आकर्षण होते. या वृक्षदिंडीत स्थानिक आदिवासी मुलांनी आणि मुलींनी आपल्या पारंपारिक वेशभूषेत समूह नृत्याच्या माध्यमांतून सादरीकरण केले. शहरी भागातील नागरिकांना अनोख्या असलेल्या या नृत्याविष्काराचा उपस्थितांनाना आदिवासी कलाकृतीचा आणि नृत्य साधनेचा तथा जीवनशैलीचा परिचय झाला. त्यानंतर बालतरूच्या पालखीचे आयोजन करण्यात आले. बालतरुची पालखी प्रकल्पाच्या मुख्य रस्त्यांनी फिरविण्यात आली. डॉ. प्रकाश आमटे, डॉ. विकास आमटे, डॉ मंदाकिनी आमटे,डॉ. दिगंत आमटे, कौस्तुभ आमटे, अनिकेत आमटे, पल्लवी आमटे, समिक्षा आमटे, डॉ अनघा आमटे, सुधाकर कडू, दिलीप हेर्लेकर, जगन मचकुले, दिलीप पेशवे, डॉ.सोमनाथ रोडे यांच्यासह अनेक मान्यवरांनी या बालतरू पालखीला आपल्या खांद्यावरून नाचत बागडत वाहून नेले. त्यानंतर विविध प्रकारच्या झाडांची लागवड करण्यात आली.कार्यक्रमाला आमटे कुटुंबियांसह , महारोगी सेवा समिती वरोरा चे विश्वस्त मंडळी, हेमलकसा लोकबिरादरी प्रकल्पाचे शुभचिंतक, परिसरातील आदिवासी बांधव, शाळकरी मुले यांच्यासह अनेक मान्यवरांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन डॉ.मंदार परांजपे यांनी केले.

# स्वरक्षणासाठी विद्यार्थीदशेत कराटे प्रशिक्षण द्यावे-डॉ.योगेश क्षीरसागर

## बीडमध्ये राज्यस्तरीय खुल्या कराटे स्पर्धेचे उद्घाटन; खेळाडूंचा सहभाग


**बीड । विशाल वाघमारे**

स्वरक्षणासाठी कराटे प्रशिक्षण काळाची गरज बनले आहे. त्यामुळे मुलांना विद्यार्थीदशेतच कराटे प्रशिक्षण द्यायला हवे, असे आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर यांनी केले.बीड शहरातील भगवान बाबा प्रतिष्ठान येथे कराटे ऑर्गनायझेशन ऑफ इंडिया(केओआय) आयोजित राज्यस्तरीय खुल्या कराटे स्पर्धेचे रविवारी (दि.२४) उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. योगेश क्षीरसागर हे बोलत होते. व्यासपीठावर यावेळी नगरसेवक सय्यद इलियास, आयोजक सय्यद मुश्ताक, शाकेरा शेख, किरण देशपांडे, डी.के.सर, प्रतिक काकडे,सपाटे, माजेद कुरेशी, मुजीब ए.वन., साजेद जागीरदार, ड. रईस पठाण आदींची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. योगेश क्षीरसागर म्हणाले, कराटे हा खेळ भारतातून चीन आणि नंतर जगात पसरला. चीनपासून हा खेळ नावरूपाला आला. या खेळातून एकमेकांबद्दल आपुलकीची भावना निर्माण होते. या खेळामध्ये पैसा, रंग,जात, धर्म या गोष्टींना थारा दिला जात नाही. ज्याप्रमाणे भारत देशाची प्रगती होत चालली



आहे, त्याचप्रमाणे कराटेची देखील प्रगती होत आहे. लहान-लहान शहरात हा खेळ खेळला जातोय. जिल्ह्यातील खेळाडूंमध्ये कराटे या खेळात रुची निर्माण झाली आहे. त्यामुळे नावाजलेले प्रशिक्षक कमी फिसमध्ये खेळाडूंना प्रशिक्षण देत आहेत. कराटे या खेळाकडे लक्ष देण्याची गरज असून भारताच्या एकात्मतेसाठी, योगदान देण्यासाठी खेळाडूंनी आपले शरीर तंदुरुस्त रहावे, यासाठी प्रयत्न केले पाहिजे. कराटे खेळाला इतर खेळासारखा पैसा लागत नसल्यामुळे गरीब कुटुंबातील मुलांनी देखील कराटे हा खेळ शिकून आपले करिअर घडवावे. या खेळासाठी सर्वांनी आपापल्या पातळीवर योगदान द्यावे. जेणेकरून जिल्ह्यातील खेळाडू आंतरराष्ट्रीय स्तरावर जाऊन जिल्ह्याचे नाव उज्वल करतील. या खेळासाठी आणि खेळाडूंना सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन डॉ. योगेश क्षीरसागर यांनी याप्रसंगी दिले. या स्पर्धेसाठी परजिल्ह्यातूनही नावाजलेले प्रशिक्षक आपले संघ घेऊन सहभागी झाले होते. या स्पर्धेला खेळाडूंचा मोठा प्रतिसाद मिळाला. यावेळी विद्यार्थी, खेळाडू, क्रीडाप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चंदनखेडा येथे घोडा उत्सव निमित्य भागवत कथा सप्ताह व शोभायात्रा



**भद्रावती । प्रतिनिधी**

सर्वधर्मीय श्रद्धास्थान तसेच महिलांना मंदिर प्रवेश व प्रसाद बंदी उठविलेले म्हणून ओळख असलेल्या चंदनखेडा येथे दि २५ डिसें ते १ जाने कालावधीत यावर्षी घोडा उत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.पंचक्रोशीतील नावारूपाला असलेल्या या श्री क्षेत्र माधवराव महाराज देवस्थान मध्ये दरवर्षी घोडा उत्सव साजरा करण्यात येतो, यावर्षी तिथीनुसार दिनांक २५ डिसें ते १ जाने या कालावधीत ह भ प सुश्री वंदनाश्री चिंतामणी कळंब यांचा श्रीमद भागवत कथा सप्ताहात काकडा आरती, हरिपाठ, प्रवचन तसेच शालेय मुले,युवा,महिलांकरिता विविध स्पर्धात्मक कार्यक्रम, धार्मिक नृत्याचा समावेश आहे, दि ३१ डिसें ला रात्रौ १२.३० वाजता रात घोडा रथ शोभायात्रा निघणार असून रात्रभर आनंदमय वातावरण टाळ मृदुंग, लेझीम टिपऱ्या अभंगाचे गजरात चंदनखेडा नगरी न्हाऊन निघणार आहे, १ जाने नवीन वर्षात कीर्तन, भक्तीगायन व काला आहे, तरी या उत्सवाचा आनंद लुटण्यासाठी सर्वधर्मीय श्रद्धाळूनी लाभ घ्यावा,असे आवाहन श्री क्षेत्र माधवराव महाराज देवस्थान सेवा समिती व गावकरी कडून करण्यात आली आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .